**शिवडी-वरळी उन्नतमार्गातील 'जी'आणि 'एफ' साऊथ विभागातील रहिवाशांचे शिरोडकर मंडईत पुनवर्सन**

**महानगर आयुक्त श्री एस.व्ही. आर.श्रीनिवास यांनी केले शिवडी वरळी प्रकल्पाचे विस्तृत सादरीकरण**

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत निर्णय**

**जास्तीत जास्त बाधितांचा समावेश, वेळेत पुनवर्सन करण्याचे निर्देश**

**मुंबई, दि. २१ नोव्हेबर, २०२२:-**

शिवडी-वरळी उन्नतमार्ग प्रकल्पातील एल्फिन्स्टन रेल्वे ओंलाडणी पुल बांधकाम बाधित 'जी'आणि 'एफ' साऊथ विभागातील रहिवाशांचे शिरोडकर मंडई येथे पुनवर्सन करण्याचा निर्णय आज सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. सदर बैठकीत स्थानिक आमदार तसेच एमएमआरडीए आणि मुंबई महानगरपालिकेचे अधिकारी उपस्थित होते.

या प्रकल्प बाधितांचे शिरोडकर मंडई पुनर्विकास प्रकल्पात उत्तमरीत्या आणि वेळेत पुनर्वसन करण्यात यावे. व्यावसायिक गाळेधारकांसह जास्तीत जास्त प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन व्हावे अशा रितीने नियोजन करा, तसेच पुनर्वसन करताना सविस्तर प्रकल्प आराखडा करण्यात यावा. इमारतींचे भुसंपादन, रहिवाशांचे करार, मंडई पुनर्विकास प्रकल्पाचा उत्कृष्ट आराखडा याबाबतीत वेळेत कार्यवाही करण्यात यावी. रहिवाशांना द्याव्या लागणाऱ्या भाड्याची महानगरपालिका आणि एमएमआरडीएने चर्चेद्वारे सर्वमान्य अशी निश्चिती करावी, पुनर्वसनाच्या बाधितांच्या अडचणी व म्हणणे विचारात घेण्यात यावे, असे निर्देश मा. मुख्यमंत्र्यांनी दिले.

**प्रकल्प पूर्णत्वाच्या दृष्टीने वेगाने काम सुरू**

शिवडी वरळी उन्नतमार्ग डॉ. आंबेडकर मार्गावरील उड्डाणपुल व सेनापती बापट मार्गावरील उड्डाणपूलांच्यावरून जातो. यामुळे सदर उन्नतमार्गाची उंची जमिनीपासून सुमारे १५ मी. ते ३० मी. इतकी ठेवण्यात आली आहे. मुंबई पारबंदर प्रकल्प आणि कोस्टल रोड यांना जोडणाऱ्या ४.५१ किमी लांबीच्या शिवडी- वरळी उन्नतमार्ग प्रकल्पाचे काम ऑगस्ट २०२१ पर्यंत ३.८१ टक्के इतके पूर्ण झाले होते ते आता ३१.४१ टक्के इतके आहे.

"शिवडी वरळी जोडरस्ता प्रकल्पामध्ये एल्फिन्स्टन येथील मुंबई महानगरपालिका नियमित रेषा (RL) बाधित निवासी आणि अनिवासी अशा एकूण ३८६ प्रकल्पबधितांचे पुनर्वसन एमएमआरडीए आणि मुंबई महानगरपालिकेमार्फत ५०:५० टक्के या सरासरीने करण्यात येईल, तसेच एकूण ४०५ चौरस फूट क्षेत्राचे गाळे निवासी प्रकल्पग्रस्तांना देण्यात येतील," असे श्री. एस. व्ही. आर. श्रीनिवास ,भा.प्र.से. महानगर आयुक्त यांनी सांगितले.






मा. मुख्यमंत्री
मा. खासदार
मा. आमदार

